# शासकीय तंत्र निकेतन , खामगांव

जलंब रोड , खामगांव जिल्हा : अकोला .

ई मेल : gpolykhamgaon@rediffmail.com Gram :POLYTECH

☎ : 07263/56644(O), 54609(r), fAX : 07263 / 52278

क्र.: शातंनिखा / जिमखाना / वार्षिकांक -२०१८ / ०१ दिनांक ~~28/12/2018~~ 01-01-2019

**सूचना क्र.३**

संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते कि , २०१७-१८ व २०१८-१९ या संयुक्त शैक्षणिक वर्षांतर्गत संस्थेचे नियतकालिक प्रकाशित करण्याचे प्रस्तावित असुन या करिता दर्जेदार साहित्य मागविण्यात येत आहे. तरी संबंधित विद्यार्थ्यांनी स्वरचित साहित्य खाली नमूद अंतिम तारखेच्या आत **श्री आर.डब्ल्यू.पाटील,अधिव्याख्याता इंग्रजी यांचेकडे जमा करावे.** साहित्य प्रकारची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे .

- **कथा /लघुकथा / काव्य /चारोळी / व्यंगचित्र / तांत्रिक लेख / शोधनिबंध /टेक्नोबझ (Technobuzz : Recent & forthcoming trends ) / विशिष्ट / उल्लेखनीय संग्राहित बाबी इत्यादी .**

**वरील साहित्यप्रकार सादर करण्याकरिता खालील अटी व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे .**

१) साहित्य स्वरचित असावे..

२) लघुकथा / तांत्रिक लेख / शोधनिबंध याकरिता अधिकत्तम शब्दमर्यादा १५० शब्द .

३) वर उल्लेखिलेल्या कोणत्याही साहित्य प्रकारामध्ये जातीवाचक,धर्मवाचक, वर्णवाचक,व्यक्तिवाचक,लिंगवाचक,महापुरुष किंवा कोणत्याही अन्य प्रकारावर टीका किंवा व्यंग असणार नाही किंवा कुणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाही याची खबरदारी घ्यावी .

४) सदर साहित्य सुवाच्य हस्ताक्षरात किंवा टंकलिखित ,योग्य समास (1.5 ") सोडून ए -४ कागदावर , कागदाच्या एका बाजूने लिहलेले / मुद्रित केलेले असणे अनिवार्य आहे.

५) विद्यार्थ्याने सादर केलेले साहित्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधिताची असेल व या करिता सदर विद्यार्थी स्वत:जबाबदार असेल याची नोंद घ्यावी .

६) संग्रहित बाबी ज्या ठिकाणाहून लिहलेल्या असतील त्याचा उल्लेख करणे अनिवार्य राहील.

७) Copy right Act चे उल्लंघन होणार नाही याची संबंधितानी खबरदारी घेणे गरजेचे आहे . या बाबीचे उल्लंघन झाल्यास संबंधितास जबाबदार समजण्यात येईल . याकरिता संस्था जबाबदार राहणार नाही तसेच कोठेही हस्तक्षेप करणार नाही .

८) साहित्य प्रकारामध्ये आवश्यक पावित्र्य असणे गरजेचे असून अश्लीलतेचा अंतर्भाव नसेल याची खबरदारी घ्यावी .

९) लेखक / कवी विद्यार्थ्याने साहित्यासोबत आपले पूर्ण नांव , अभ्यासक्रम / भ्रमणध्वनी क्र. व पासपोर्ट आकारचे फोटो जोडावे

१०) साहित्याची छाननी व निवड याचे सर्व हक्क संबंधित साहित्य निवड समितीकडे राखून ठेवण्यात येत आहेत .

११) **साहित्य जमा करण्याची अंतिम तारीख २५/०१/२०१९ निश्चित करण्यात आलेली आहे . यानंतर आलेल्या कोणत्याही साहित्याचा स्वीकार केल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी. अधिक माहिती करिता डॉ.एम.ए.कुरेशी** , (अधि.स्थापत्य अभि.) **किंवा श्री आर. डब्ल्यू.पाटील** (अधिव्याख्याता इंग्रजी) यांचेशी संपर्क साधावा .

प्राचार्य ,

शासकीय तंत्र निकेतन , खामगाव

प्रत : १) विभाग प्रमुख संगणक / स्थापत्य /विद्युत / अणुविद्युत /यंत्र / उपयोजित यंत्रशास्त्र /विभाग नियंत्रक विज्ञान / कर्मशाळा/ प्रशिक्षण व आस्थापना विभाग /जिमखाना / ग्रंथालय/कार्यालय माहिती व आवश्यक कार्यवाही करिता संबंधीत विभाग प्रमुख , विभाग नियंत्रक कळविण्यात येते कि , सदर उपक्रमाच्या यशस्वितेकरिता आपल्या स्तरावर आवश्यक ते प्रयत्न करावे. (२) विद्यार्थी सूचना फलक (३) सुचाना फलक जिमखाना (४) श्री के.एम.आंबटकर यांना संस्थेच्या संकेत स्थळावर उपलोड करण्याकरिता .